॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.१३ ( प्रतिनिधी) :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळेस राष्ट्रीय सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षेचे तीन पुरस्कार महाराष्ट्राचे मा. राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते देण्यात आले.

यावेळी सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर, महाराष्ट्र सायबर उपमहानिरीक्षक संजय शिंते, क्वीकहिल फाउंडेशनच्या अनुपमा काटकर उपस्थित होते. क्वीक हिल फाउंडेशन आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांच्या झालेल्या सामंजस्य कराराच्या अनुषंगाने संगणक शास्त्र प्रशाळेतील विद्यार्थ्यांनी, जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्हयातील ग्रामिण तसेच शहरी भागातील १०० शाळा आणि महाविद्यालयांमध्ये जाऊन ७० हजार विद्यार्थी आणि २० हजार सामान्य व ज्येष्ठ नागरिकांमध्ये सायबर सुरक्षेचे प्रबोधन केले त्याबद्दल १२ जानेवारी २०२५ रोजी पुणे येथे आयोजित कार्यक्रमात वरील तीन पारितोषिके देण्यात आलीत. विद्यार्थी मयुर बांडे, निखील हिरे यांना बेस्ट सायबर वॉरीअर टिम तर रेवती फिरके या विद्यार्थिनीला बेस्ट कम्युनिटी डायरेक्टर उपविजेता घोषित करण्यात आले. तसेच प्रशाळा व विद्यापीठास बेस्ट क्लब ओव्हर ऑल रनर ऑफ हा पुरस्कार देण्यात आला. या यशा करीता क्वीकहिल क्लब विद्यापीठस्तरीय अध्यक्ष पायस सावळे, मिडीया डायरेक्टर प्रगती कोल्हे, समन्वयक प्रा. राजू आमले, प्रशाळेचे संचालक प्रा. आर. जे. रामटेके, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परीश्रम घेतले.

**बातमी नं २**

जळगाव दि.१३ ( प्रतिनिधी) :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील योगशास्त्र विभागामार्फत विवेकांनद जयंती निमित्त स्वामी 'विवेकानंदांचे जीवनकार्य व योग' या विषयावर डॉ. पराग जहागीरदार यांचे व्याख्यान रविवार दि. १२ जानेवारी रोजी विद्यापीठात आयोजित करण्यात आले.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वांवर आधारीत असलेल्या एम.ए. योगशास्त्र अभ्यासक्रमांतर्गत स्वामी विवेकानंदांचे चार योग समाविष्ट केलेले आहेत. डॉ. पराग विलास जहागीरदार, मानस हॉस्पिटल, जळगाव तथा संचालक,विवेकानंद केंद्र, जळगाव यांनी स्वामी विवेकानंदांच्या चार योगांचा परस्पर संबंध समजावून सांगितला. त्यांनी " ऑल स्ट्रीम्स ऑफ योगा लीड टू द सेम गोल, डू इट बाय वर्क (कर्मयोग), वरशिप (भक्तियोग) फिलोसॉफी (ज्ञानयोग) ऑर सायकिक कंट्रोल (राजयोग) बाय एनी वन ऑर टू ऑर ऑल ऑफ दीज ॲण्ड फ्री" या स्वामी विवेकानंदांच्या जीवन कार्यातील छोट्या छोट्या गोष्टी सांगून अतिशय सोप्या पद्धतीने विवेकानंदांचे व्यक्तिमत्व व चरित्र विद्यार्थ्यांपुढे समर्पकपणे मांडले युवा पिढीमध्ये या चारही योगाचे प्रयोजन देशाच्या व समाजाच्या उन्नतीच्या दृष्टीने किती महत्वाचे आहे हेही समजावून सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक इंजि राजेश पाटील, विभाग प्रमुख, योगशास्त्र विभाग यांनी केले. तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. लीना चौधरी व आभार प्रदर्शन प्रा. लिन्ता चौधरी यांनी केले. या कार्यक्रमप्रसंगी प्रा.गीतांजली भंगाळे, योगशास्त्र विभागाचे सर्व विद्यार्थी, शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी एकनाथ नन्नवरे, तुषार सोनवणे, माधवी तायडे यांचे सहकार्य लाभले.

**बातमी नं ३**

जळगाव दि.१३ ( प्रतिनिधी) :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास व संशोधन प्रशाळेतील प्रा. स्नेहा गायकवाड यांचे प्रेमचंद मुंशींचे हिंदी साहित्यातील योगदान व्याख्यान आयोजित करण्यात आले. .

यावेळी अध्यक्षस्थानी प्रशाळेचे संचालक प्रा. म.सु. पगारे उपस्थित होते. आपल्या व्याख्यानात बोलतांना गायकवाड यांनी हिंदी साहित्याचा आदीकाळ, भक्तीकाळ, रितीकाळ व आधुनिक काळ यावर सविस्तर चर्चा केली. नाथ साहित्य, जैन साहित्य यांची मांडणी व त्या काळातील आवश्यक साहित्यिक व समाजातील घडामोडींवर आपल्या व्याख्यानातून प्रकाश टाकला. प्रेमचंद मुंशी यांचा वैचारिक गद्यावर बोलतांना सेवासदन, कफन, ईदगाह, पुषकी रात यागोष्टी सादर केल्या.

अध्यक्षीय समारोप करतांना प्रा. म.सु. पगारे यांनी अभ्यासक हा नेहमी जागा राहतो असे म्हणत अभ्यासकाने ज्ञान प्राप्तीसाठी अनुभूती घेणे गरजेचे असते असे प्रतिपादन केले. यानंतर प्रश्नोत्तरे झाली. यावेळी डॉ. सुदर्शन भवरे, कृष्णा संदानशीव, भारती सोनवणे, नेत्रा उपाध्येय यांनी प्रश्न विचारले यावेळी प्रशाळेतील प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रतिभा गलवाडे यांनी मांडले.

---

जा क्र. कबचौउमवि/१६/ बातमी/२०२५ दि १३ जानेवारी २०२५

प्रति

मा. संपादक

कृपया वरील बातमी प्रसिध्दीस देऊ सहकार्य करावे ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता